# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील मेट्रो- तीनचे काम सुसाट

## १९ महिन्यांत पन्नास टक्के भुयारीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी)ने मेट्रो-३ मार्गिकेचा अवघ्या १९ महिन्यांत ५० टक्के भुयारीकरणाचा टप्पा गाठला आहे. या मार्गासाठी एकूण ५६ किमीचे भुयारीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ हा मुंबईच नव्हे तर भारतातील सर्वात लांब संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग आहे. हा प्रकल्प गतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी मेट्रो-३ प्रशासन प्रयत्नशील आहे. यासाठी जागतिक दर्जाच्या सुरक्षा मानकांचा वापर करण्यात येत आहे. यामुळे कोणताही अपघात न होता केवळ १९ महिन्यांत ५० टक्के काम पूर्ण करण्यात आल्याचे एमएमआरसीतर्फे स्पष्ट करण्यात आले.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले की, भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीत मुंबईतील अतिशय जुन्या इमारती, मिठी नदी व उन्नत मुंबई मेट्रो - १ खालून भुयारीकरण करणे जिकिरीचे आहे. विशेष म्हणजे सुरक्षेबाबत कुठलीही तडजोड न करता सुरक्षेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून आम्ही हे काम पूर्ण करण्यात आले आहे.

प्रकल्प सल्लागार, कंत्राटदार या सर्वांचा या यशात सहभाग आहे. भुयारीकरणाप्रमाणे खोदकाम, बेस स्लॅब, कॉनकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतींची बांधणी यासारखी कामेदेखील युद्धपातळीवर सुरु आहेत. मुख्यमंत्र्यांच्या वॉर रुमद्वारे नियमितपणे घेतला जाणारा आढावा, विविध भागीदारी संस्थांचे सहकार्य आणि मुंबईकरांच्या भक्कम पाठिंब्याच्या जोरावर हा प्रकल्प वेळेत पूर्ण करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्गावरील मेट्रो-तीनच्या कामासाठी मुंबईच्या भूगर्भात एकूण १७ टीबीएम्स कार्यरत आहेत. या मशीनच्या सहाय्याने भुयारीकरणाचे १३ टप्पे पार पडले असून अवघ्या १९ महिन्यांत पन्नास टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

### असे झाले भुयारीकरणाचे तेरा टप्पे पूर्ण

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सप्टेंबर २०१७ मध्ये नयानगर लॉंचिंग शाफ्टमध्ये कृष्णा-१ हे टीबीएम उतरविल्यानंतर ६ नोव्हेंबर २०१७ पासून प्रत्यक्ष भुयारीकरणाला सुरुवात झाली.
- मुंबईच्या भूगर्भात एकूण १७ टीबीएम्स सध्या कार्यरत आहेत. भुयारीकरणाचा पहिला टप्पा सप्टेंबर २०१८ रोजी पार पडला. त्यानंतर केवळ ८ महिन्यांत १२ टप्पे पार पडले आहेत.
- आतापर्यंत सीप्झ येथे १, सीएसएमआयए-टी २ येथे २, सहार, एमआयडीसी, वरळी आणि आंतरदेशीय विमानतळ येथे प्रत्येकी १ तर दादर, विद्यानगरी आणि विधानभवन येथे प्रत्येकी २ अशा प्रकारे भुयारीकरणाचे एकूण १३ टप्पे पार पडले आहेत.
- टीबीएम्स भूगर्भात उतरविण्यासाठी कफ परेड, इरॉस सिनेमा, आझाद मैदान, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, नयानगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारिपुत नगर, सहार रोड आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ येथे लॉंचिंग शाफ्ट बांधण्यात आले आहेत.